सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९ वे, राजपत्र क्र. २२] गुरुवार ते बुधवार, जून १-७, २०२३ : ज्येष्ठ, ११-१७, शके १९४५ [पृष्ठे - १०,

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–औरंगाबाद विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

	पृष्ठे		पृष्ठे
भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ औरंगाबाद विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	– ते –	भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ औरंगाबाद विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.	ते —
शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ औरंगाबाद विभागाशी संबंधित असलेले.	५४९ ते ५५८		

शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

१

अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून

नगर विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१९/०५/२०२३

अधिसुचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ :-

क्र. टिपीएस - ३४२२/९६३/प्र.क्र.१६०/२०२२/नवि -३० :- ज्या अर्थी, उस्मानाबाद शहराच्या वाढीव हद्दीची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "**उक्त अधिनियम**" असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागची अधिसूचना क्र. टिपीएस-३४१५/१३९३/प्र. क्र. २५३/२०१५/नवि-३०, दि. ०९/०९/२०१६ अन्वये मंजूर झाली असून ती दि. ०३/१२/२०१६ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "**उक्त विकास योजना**" असे संबोधिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे उस्मानाबाद येथील सर्व्हे क्र. ७४ मधील १३.७९ हेक्टर क्षेत्र (यापुढे "**उक्त क्षेत्र**" असे संबोधले आहे) कृषी तथा ना विकास विभागामध्ये दर्शविली आहे;

आणि ज्याअर्थी, उस्मानाबाद नगरपरिषदेने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) मध्ये दिलेली वैधानिक पध्दती अनुसरुन दि. २२/१२/२०२१ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ०४ अन्वये उक्त विकास योजनेतील उक्त क्षेत्र कृषी तथा ना विकास विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठीं सादर केलेला आहे (यापुढे "**उक्त प्रस्तावित फेरबदल**" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशी नंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त प्रस्तावित फेरबदल काही अटीसह मंजूर करावा असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, आता उक्त जमिनीच्या मालकांनी प्रचलित वार्षिक बाजारमूल्यदर तक्त्यानुसार येणा-या उक्त जमिनीच्या एकुण रकमेच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमुल्याची ५०% रक्कम रु. २४,४७,७२५/- सहायक संचालक, नगर रचना, उस्मानाबाद शाखा, उस्मानाबाद यांच्या लेखाशिर्षामध्ये दि. ०४/०५/२०२३ रोजी जमा केलेली आहे, आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रु.२४,६१,९२५/- दि. २६/०५/२०२२ रोजी उस्मानाबाद नगरपरिषदेकडे जमा केलेली आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकाराचा वापर करुन, उक्त विकास

योजनेतील उक्त फेरबदल प्रस्तावाखालील, मौजे उस्मानाबाद येथील सर्व्हे क्र. ७४ मधील १३.७९ हेक्टर क्षेत्रासाठीच्या फेरबदलास शासन काही अटीसह मंजूरी देत आहे, आणि त्यासाठी उपरोक्त दि. ०९/०९/२०१६ ची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे;

"विकास योजना मंजूरीच्या अधिसूचनांच्या फेरबदल सुचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे."

नोंद

मौजे उस्मानाबाद येथील सर्व्हे क्र.७४ मधील १३.७९ हेक्टर क्षेत्र, नकाशात दर्शविल्यानुसार, खालील अटीच्या अधिन राहून, कृषी विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

अट क्र.१ - फेरबदलाखालील क्षेत्राचा विकास करताना एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार आवश्यक १०% अनिवार्य खुल्या जागेव्यतिरिक्त, अतिरिक्त १०% सुविधा क्षेत्र प्रस्तावित करणे बंधनकारक राहील.

अट क्र.२ - सुविधा क्षेत्राचा विकास मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र. ३.५.१ नुसार करण्यात यावा.

अट क्र.३ - पायाभूत सोयी सुविधा जमिनमालक/ विकासकर्त्यांनी स्वखर्चाने विकसीत करणे बंधनकारक राहील.

अट क्र.४ - उपरोक्त मूलभूत सुविधांचा विकास क्रमाने करताना एकूण अपेक्षित सुविधाचा विकास टप्प्याने होत असताना अर्जदारावर एकूण जागेच्या भूखंड विक्रीवर बंधन खालीलप्रमाणे राहतील. मुख्याधिकारी, उस्मानाबाद, नगरपरिषद, उस्मानाबाद यांनी सदर बाबींवर नियंत्रण ठेवावे.

अ	अभिन्यास अंतीमतः मंजूर झाल्यानंतर	-	एकुण २५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील
ब	सुमारे ४०% मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर	-	एकुण ५०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील
क	सुमारे ६०% मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर	-	एकुण ७५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील
ड	सुमारे ८० % मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर	-	एकुण ९०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील
इ	सुमारे १००% मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर	-	एकुण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील

वरील बाबत उल्लंघन झाल्याबाबत रेखांकन व आकृषिक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

जर अभिन्यासात समुह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद, उस्मानाबाद यांनी विहित केल्यानुसार सर्व मुलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही."

सदरची अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in/Acts & Rules या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(वीणा मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Government of Maharashtra
Urban Development Department
Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032.
Dated : - 19/05/2023
NOTIFICATIONS

The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 :

No. TPS - 3422/963/CR - 160/2022/UD - 30 :- Whereas, the Development Plan of extended limit of Osmanabad City, Dist. Osmanabad, has been sanctioned by the Government under section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act") *vide* Notification No. TPS - 3415/ 1393 / CR - 253/ 2015/ UD - 30, dated the 09/09/2016 and has come into force with effect from the 03/12/2016 (hereinafter referred to as " the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan, the land admeasuring 13.79 Hect. bearing Survey No. 74 of Mauje Osmanabad (hereinafter referred to as "the said Land") is included in " Agriculture / No Development Zone";

And whereas, as per the provisions of section 37 (1) of the said Act, the Osmanabad Muncipal Council *vide* its General Body Resolution No.04, dated the 22/12/2021, has resolved to make modification in the said Development Plan, so as to delete the said Land from Agriculture / No Development Zone and to include the same in Residential Zone (hereinafter referred to as "the said Proposed Modification") and accordingly submitted the proposal to the Goverment for sanction;

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of opinion that, the said Proposed Modification should be sanctioned with certain conditions;

And whereas, the land owner of the said Land, has deposited 50% the Goverment share of 5% premium amount as per the rate of said Land as prescribed in the Annual statement of rates (ASR) for the prevailing year in the Government Treasury *vide* challan Rs.24,47,725 /-, dated the 04/05/2023, through the Assistant Director of Town Planning, Osmanabad, Branch, Osmanabad and the remaining 50% of the 5% premium amount of Rs 24,61,925/- has been deposited with the Osmanabad Muncipal Council, Osmanabad, dt. 26/05/2022;

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section (2) of section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby sanctions the said Proposed Modification with some conditions, for 13.79 Hect, land bearing Survey No. 74 of Mauje Osmanabad, as shown on plan and for that purpose amends the above said Notification dated the 09/09/2016 as follows :-

"In the Schedule of Modifications appended to the Notification sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry.":-

ENTRY

" The land admeasuring 13.79 Hect. land bearing Survey No. 74 of Mauje Osmanabad, is deleted from Agriculture / No Development Zone and the land so released is included in Residential Zone as shown on plan, subject to following conditions-.

Condition No.1- While developing the land under modifications, in addition to 10% compulsory open space, it is mandatory to provide necessay 10% amenity space, as per the Sanctioned Unified Development Control and Promotion Regulations.

Condition No.2- The amenity space shall be developed as per the provision of Regulation No.3.5.1 of the Sanctioned Unified Development Control and Promotion Regulations.

Condition No.3- It is mandatory for the Land Owner/ Developer, to develop required infrastructure amenities at his own cost.

Condition No.4 - If the abovesaid infrastructure amenities are proposed to be developed by stages, then sale of plots shall be monitored by the Chief Officer, Osmanabad Muncipal Council, Osmanabad in relation to expected development of civic amenities as per the stages given below.

A.	After final approval of layout	sale of 25% of total plots shall be permissible
B.	After completion of 40% of civic Amenities.	sale of 50% of total plots shall be permissible
C.	After completion of 60% of civic Amenities.	sale of 75% of total plots shall be permissible
D.	After completion of 80% of civic Amenities.	sale of 90% of total plots shall be permissible
E.	After completion of 100% of civic Amenities.	sale of 100% of total plots shall be permissible

In case of violation of the above, the layout and non-agriculture permission will be eligible for revocation.

If group housing is to be developed in the layout, occupation certificate should not be issued unless all the infrastructure facilities are developed."

A copy of the part plan showing the aforesaid sanctioned modifications shall be available in the office of Chief Officer, Osmanabad Municipal Council, Osmanabad during office hours on all working days for inspection of public for a period of one month.

This Notification shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in/Acts & Rules.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

(Veena More)

Under secretary to Government

२

अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून

नगर विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१९/०५/२०२३

अधिसुचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ :-

क्र. टिपीएस - ३४२३/प्र.क्र.२३/२०२३/नवि -३० :- ज्या अर्थी, उस्मानाबाद शहराच्या वाढीव हद्दीची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "**उक्त अधिनियम**" असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागची अधिसूचना क्र. टिपीएस-३४१५/ १३९३/प्र. क्र. २५३/२०१५/नवि-३०, दि. ०९/०९/२०१६ अन्वये मंजूर झाली असून ती दि. ०३/१२/२०१६ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "**उक्त विकास योजना**" असे संबोधिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे उस्मानाबाद येथील सर्व्हे क्र. ७५ मधील १३.९१ हेक्टर क्षेत्र (यापुढे "**उक्त क्षेत्र**" असे संबोधले आहे) कृषी तथा ना विकास विभागामध्ये दर्शविली आहे;

आणि ज्याअर्थी, उस्मानाबाद नगरपरिषदेने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) मध्ये दिलेली वैधानिक पध्दती अनुसरुन दि. ०९.०९.२०२२ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. १५५ अन्वये उक्त विकास योजनेतील उक्त क्षेत्र कृषी तथा ना विकास विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर केलेला आहे (यापुढे "**उक्त प्रस्तावित फेरबदल**" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशी नंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त प्रस्तावित फेरबदल काही अटीसह मंजूर करावा असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, आता उक्त जमिनीच्या मालकांनी प्रचलित बाजारमूल्यदर तक्त्यानुसार येणा-या उक्त जमिनीच्या एकुण रकमेच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमुल्याची ५०% रक्कम रु. २४,६९,०२५/- सहायक संचालक, नगर रचना, उस्मानाबाद शाखा, उस्मानाबाद यांच्या लेखाशिर्षामध्ये दि. ०४/०५/२०२३ रोजी जमा केलेली आहे, आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रु.२४,६९,०२५/- दि. २४/०२/२०२३, व दि. १०/०५/२०२३ रोजी उस्मानाबाद नगरपरिषदेकडे जमा केलेली आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकाराचा वापर करुन, उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्तावाखालील, मौजे उस्मानाबाद येथील सर्व्हे क्र. ७५ मधील १३.९१ हेक्टर क्षेत्रासाठीच्या फेरबदलास शासन काही अटीसह मंजूरी देत आहे, आणि त्यासाठी उपरोक्त दि. ०९/०९/२०१६ ची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे;

"विकास योजना मंजूरीच्या अधिसूचनांच्या फेरबदल सुचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे."

नोंद

मौजे उस्मानाबाद येथील सर्व्हे क्र. ७५ मधील १३.९१ हेक्टर क्षेत्र, नकाशात दर्शविल्यानुसार, खालील अटींच्या अधिन राहून, कृषी विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

अट क्र.१ - फेरबदलाखालील क्षेत्राचा विकास करताना एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार आवश्यक १०% अनिवार्य खुल्या जागेव्यतिरिक्त, अतिरिक्त १०% सुविधा क्षेत्र प्रस्तावित करणे बंधनकारक राहील.

अट क्र.२ - सुविधा क्षेत्राचा विकास मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र. ३.५.१ नुसार करण्यात यावा.

अट क्र.३ - पायाभूत सोयी सुविधा जमिनमालक / विकासकर्त्यानी स्वखर्चाने विकसीत करणे बंधनकारक राहील.

अट क्र.४ - उपरोक्त मूलभूत सुविधांचा विकास क्रमाने करताना एकूण अपेक्षित सुविधाचा विकास टप्प्याने होत असताना अर्जदारावर एकूण जागेच्या भूखंड विक्रीवर बंधन खालीलप्रमाणे राहतील. मुख्याधिकारी, उस्मानाबाद, नगरपरिषद, उस्मानाबाद यांनी सदर बाबींवर नियंत्रण ठेवावे.

अ	अभिन्यास अंतीमतः मंजूर झाल्यानंतर	-	एकुण २५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील
ब	सुमारे ४०% मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर	-	एकुण ५०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील
क	सुमारे ६०% मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर	-	एकुण ७५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील
ड	सुमारे ८० % मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर	-	एकुण ९०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील
इ	सुमारे १००% मुलभुत सुविधा पूर्ण झाल्यावर	-	एकुण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील

वरील बाबत उल्लघंन झाल्याबाबत रेखाकंन व अकृषिक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

जर अभिन्यासात समुह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद, उस्मानाबाद यांनी विहित केल्यानुसार सर्व मुलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही."

सदरची अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in/Acts & Rules या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(वीणा मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Government of Maharashtra
Urban Development Department
Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai - 400 032.
Dated :- 19.05.2023

NOTIFICATION

The Maharashtra Regional & Town Planning Act,1966:

No.TPS-3423/ CR- 23 / 2023/ UD - 30 :- Whereas, the Development Plan of extended limit of Osmanabad City, Dist. Osmanabad has been sanctioned by the Government under section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS-3415/ 1393/CR-253/2015/UD-30, deated the 09.09.2016 and has come into force with effect from the 03.12.2016 (hereinafter referred to as "the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan, the land admeasuring 13.91 Hect. bearing Survey No. 75 of Mauje Osmanabad (hereinafter referred to as "the said Land") is included in "Agriculture / No Development Zone";

And whereas, as per the provision of section 37 *(1)* of the said Act, the Osmanabad Municipal Council *vide* its General Body Resolution No. 155, deted the 09.09.2022, has resolved to make modification in the said Development Plan, so as to delete the said Land from Agriculture / No Development Zone and to include the same in Residential Zone (hereinafter referred to as "the said Proposed Modification") and accordingly submitted the proposal to the Government for sanction;

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of opinion that, the said Proposed Modification should be sanctioned with certain conditions;

And whereas, the land owner of the said Land, has deposited 50% the Government share of 5% premium amount as per the rate of said Land as prescribed in the Annual statement of rates (ASR) for the prevailing year, in the Government Treasury *vide* challan Rs. 24,69,025/- deted 04.05.2023, through the Assistant Director of Town Planning, Osmanabad Branch, Osmanabad and the remaining 50% of the 5% premium amount of Rs. 24,69,025/- has been deposited with the Osmanabad Municipal Council, Osmantabad, dated the 24.02.2023, 24.02.2023 & 10.05.2023;

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section (2) of section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby sanction the said Proposed Modification with some conditions, for 13.91 Hect. Land beaaring Survey No. 75 of Mauje Osmanabad, as shown on plan and for that purpose amends the above said Notification dated the 09.09.2016 as follows:-

" In the Schedule of Modification appended to the Notification sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after tha last entry." :-

ENTRY

"The land admeasuring 13.91 Hect. bearing Survey No. 75 of Mauje Osmanabad, is deleted from Argiculture / No Development Zone and the land so released is included in Residential Zone as shown on plan, subject to following conditions.-

Condition No. 1 - While developing the land under modification, in addition to 10% compulsory open space, it is mandatory to provide necessary 10% amenity space, as per the Sanctioned Unified Development Control and Promotion Regulation.

Condition No. 2 - The amenity space shall be developed as per the provision of Regulation No. 3.5.1 of the Sanctioned Unified Development Control and Promotion Regulations.

Condition No. 3 - It is mandatory for the Land Owner / Developer, to develop required infrastructure amenities at his own cost.

Condition No. 4 - If the abovesid infrastructure amenities are proposed to be developed by stages, then sale of plans shall be monitored by the Chief Officer, Osmanabad Municipal Council. Osmanabad in relation to expected development of civic amenities as per the stages given below.

A.	After final approval of layout	sale of 25% of total plots shall be permissible
B.	After completion of 40% of civic Amenities.	sale of 50% of total plots shall be permissible
C.	After completion of 60% of civic Amenities.	sale of 75% of total plots shall be permissible
D.	After completion of 80% of civic Amenities.	sale of 90% of total plots shall be permissible
E.	After completion of 100% of civic Amenities.	sale of 100% of total plots shall be permissible

In case of violation of the above, the layout and non-agriculture permission will be eligible for revocation.

If group housing is to be developed in the layout, occupation certificate should not be inded unless all the infrastructure facilities are developed."

A copy of the part plan showing the aforsaid sanctioned modification shall be available in the office of Chief Officer, Osmanabad Municipal Council, Osmanabad during office hours on all working days for inspection of public for a period of one month.

This Notification shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in / Acts & Rules.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

VEENA B. MORE
Under Secretary to Government.

संकिर्ण अधिसूचना

३

कार्यासन अधिकारी, पुणे यांजकडून
महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती इमारत,
पुणे - ४११००१

आदेश

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ :-

जा. क्र. डि. टी. पी./ वि. यो. किनवट (सु.)/ आ.क्र. ३४. A/कलम - १२७ (२)/आदेश/टिपीव्ही.५/२२२६ दि. १७/०५/२०२३

ज्या अर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे **"उक्त अधिनियम"** असे संबोधिलेले आहे) चे कलम ३१ (१) चे तरतुदीनुसार किनवटनगर परिषदेची विकास योजना (सुधारित) शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-३२००/४५००/सि आर -२३८ (ए)/२०००/नवि-३०, दि. २७/०५/२००२ रोजी भागशः मंजूर असून ती. दि.१५/०७/२००२ पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-३२०३/१५०८/सि आर-३२६ (बी)/२००३/ नवि. ३०, दि.३१/१०/२००५ अन्वये मंजूर असून (यापुढे **"उक्त अधिसूचना"** असे संबोधिलेले आहे.) ती दि.१५/१२/२००५ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे **"उक्त मंजूर विकास योजना"** असे संबोधिलेले आहे);

आणि ज्या अर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौजे किनवट, जि. नांदेड येथील स. न. २९४, २९५, २९६, २९७, २९८ या जमिनीमधील अंदाजे ४.७५ हे क्षेत्र आ. क्र. ३४. A. 'ट्रक टर्मिनल' (यापुढे **"उक्त आरक्षण"** असे संबोधिलेले आहे.) या आरक्षणाने बाधित होत आहे आणि उक्त

आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण किनवट नगर परिषद आहे. (यापुढे **"उक्त समुचित प्राधिकरण"** असे संबोधिलेले आहे);

आणि ज्या अर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही.

आणि ज्या अर्थी, संबंधित जमीन मालकांनी (यापुढे **"उक्त जमीन मालक"** असे संबोधिलेले आहे.) मौजे किनवट येथील स.नं. २९४ पै. (क्षेत्र. ०.४३६३ हे.) सं. नं. २९५ (क्षेत्र ०.४३हे.) व. स. नं. २९६ (क्षेत्र. २.२२हे.) या जमिनींमधील असे एकूण ३.०८६३ हे क्षेत्रावरील (यापुढे **"उक्त जमीन"** असे संबोधिलेले आहे.) उक्त आरक्षणासाठी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीनुसारची दि. १०/०५/२०१९ रोजीची सूचना उक्त समुचित प्राधिकरणावर बजावलेली असून (यापुढे **"उक्त सूचना"** असे संबोधिलेले आहे.) ती उक्त समुचित प्राधिकरणास दि. १६/०५/२०१९ रोजी प्राप्त झाली आहे;

आणि ज्या अर्थी, उक्त सूचना उक्त समुचित प्राधिकरणास प्राप्त झाल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, २४ महिन्यांच्या विहित मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमिनी संपादित केलेल्या नाहीत अथवा उक्त जमिनींचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (१) मधील तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही;

आणि ज्या अर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठात उक्त जमीन मालकांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ८९९५/२०२१ मध्ये मा. न्यायालयाने दि.०२/१२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये (यापुढे **"उक्त आदेश"** असे संबोधिलेले आहे) संबंधित याचिकाकर्ते यांच्या मालकीचे स. नं. २९४ (क्षेत्र -०.४३६० हे.), स. नं. २९५ (क्षेत्र. ०.४३ हे.) व. स. नं.२९६ (क्षेत्र. २.२२ हे.) या जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले असून शासनास उक्त अधिनियमाचे कलम. १२७ (२) चे तरतुदीनुसार मा. न्यायालयाच्या उक्त आदेशापासून ६ महिन्याच्या आत अधिसूचना निर्गमित करणेबाबत निर्देश दिलेले आहेत;

आणि ज्या अर्थी, मुख्याधिकारी, किनवट नगर परिषद यांनी दि. ०५/०४/२०२२ रोजीच्या पत्र क्र. ५७३/२०२२ अन्वये सदर प्रकरणी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) नुसारचे आदेश प्रसिध्द करणे योग्य होईल, असा अहवाल सादर केलेला आहे;

आणि ज्या अर्थी, सहसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी पत्र क्र. १९२६, दि. ०७/१२/२०२२ अन्वये उक्त जमीन मालक यांनी बजावलेल्या उक्त सूचने अंतर्गत व मोजणी नकाशानुसार मौ. किनवट येथील स. नं. २९४ (पै.) (क्षेत्र ०.४३ हे.), स. नं. २९५ (क्षेत्र ०.३५ हे.) व स. नं. २९६ (क्षेत्र१.६३ हे.) असे एकूण २.४१ हे. क्षेत्रावरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबतची उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) ची अधिसूचना निर्गमित करणेबाबत अहवाल सादर केलेला आहे;

आणि ज्या अर्थी, उक्त जमीनींवरील उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त जमिनींवरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबतचे आदेश उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्या अर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३२११/ प्र. क्र. ५०८/ नवि- १३, दि. ०१/१२/२०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा/ नगर पंचायती आणि जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

आता, त्या अर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे हे, या आदेशान्वये खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनींवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत :-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

परिशिष्ट

अ.क्र.	नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा	उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व वि. यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र.	उक्त सूचनेखालील उक्त जमिनींचा तपशिल	उक्त आरक्षणातून व्यपगत झालेल्या भागाचे अंदाजे क्षेत्र (हे.)
१	किनवट नगर परिषद, मौजे किनवट, ता. किनवट, जि. नांदेड.	आ. क्र. ३४- A - "ट्रक टर्मिनल" (४.७५ हे.)	स. नं. २९४ पै.	०.४३ हे.
			स. नं. २९५	०.३५ हे.
			स. नं. २९६	१.६३ हे.
			एकूण.	**२.४१ हे.**

टिप :-

०१) उक्त आरक्षणामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनी हया लगतच्या जमिनींवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणा-या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीनमालकास उपलब्ध होईल.

०२) उक्त जमिनीचे उक्त आरक्षणातून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणा-या उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, किनवट नगर परिषद, किनवट, जि. नांदेड यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

०३) सदर आदेश संचालनालयाच्या www. dtp.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

ORDER

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No. D. T. P. / D. P. Kinwat (R.) Site No. 34- A/Sec-127 (2)/ Order/TPV-V/ 2226

Date : -17/05/2023

Whereas, the Development Plan of Kinwat Muncipal Council (Revised) has been partly sanctioned as per the provisions of section 31 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "**the said Act**") by the Government of Maharashtra in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1200/4500/ C. R. 238 (A)/ 2000/ U D-30, dated 27/05/2002 and the same has come into force with effect from 15/07/2022, while the Development Plan of the Excluded Part has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department *vide* Notification No. TPS-3203/1508/ C. R.- 326 (B)/ 2003/UD -30, dated 31/10/2005 (hereinafter referred to as "**the said sanctioned Development Plan**") and the same has come into force with effect from 15/12/2005 (hereinafter referred to as "**the said Notification**") ;

And whereas, as per the said sanctioned Development Plan, approximatearea of 4.75 Ha.of the land bearing S. No 294, 295, 296, 297, 298 of Mauje Kinwat, Tal Kinwat, Dist. Nanded is affected by Reservation Site No.34 A- 'Truck Terminal'(hereinafter referred to as "**the said Reservation**") and the Appropriate Authority for acquisition and development of the said Reservation is Municipal Council, Kinwat (hereinafter referred to as "**the said Appropriate Authority**").

And whereas, the Land under the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said sanctioned Development Plan came into force ;

And whereas the concerned land owners (hereinafter referred to as "**the said Land Owners)**" of the land bearing S. No.294 (part) (Area - 0.4363 Ha.) S. No. 295 (Area-0.43 Ha.) and S. No. 296 (Area -2.22 Ha.) total admeasuring 3.0863 Ha. (hereinafter referred to as "**the said Lands**") had served a notice for the said Reservation on the said Lands as per the provisions of section 127 (1) of the said Act dated 10/05/2019 (hereinafter referred to as "**the said Notice**") on the said Appropriate Authority which was received by the said Appropriate Authority on 16/05/2019 ;

And whereas, the said Lands under the said Reservation are not acquired or no steps as required as per the provisions of section 127(1) of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period of 24 months after receipt of the said Notice ;

And whereas, in the Writ Petition No. 8995/2021 filed by the said Land Owners in the Hon'ble High Court, Mumbai, Aurangabad Bench, the Hon'ble Court has passed an order dated 02/12/2021 (hereinafter referred to as "**the said Order**") stating that, the said Reservation on lands bearing S. No.294 (Area-0.4360 Ha.), S. No. 295 (Area-0.43 Ha.) and S. No.296 (Area-2.22 Ha.) owned by the concerned petitioners has lapsed and has directed the Government to issue notification as per the provisions of section 127 (2) of the said Act within a period of six (06) months from the date of the said Order ;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Kinwat *vide* letter No. 573/2022 dt.05/04/2022 has submitted a report stating that, it would be appropriate to publish the order under Section 127(2) of the said Act ;

And whereas, the Joint Director of Town Planning, Aurangabad Division, Chatrapati Sambhajinagar *vide* letter No. 1926, dt. 07/12/2022 has stated that, in regards with the said Notice and the Measurement Plan submitted by the said Land Owners, the said Reservation on the lands bearing S. No. 294 (part) (Area -0.43 Ha.), S. No.295 (Area - 0.35 Ha.) and S. No. 296 (Area - 1.63 ha.) total admeasuring 2.41 Ha. has been lapsed and accordingly has submitted a report for issuance of notification as per the provisions of section 127 (2) of the said Act;

And whereas, after considering the above facts in respect of, the said Reservation on the said Lands in the said sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order as per the provisions of section 127 (2) of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on the said Land ;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS - 1813/3211/ CR - 508/UD-13, dated 01/12/2016 has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 (2) of the said Act in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat/ Zilla Parishad as a Planning Authority to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune ;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by this order and as mentioned in the Schedule hereinafter hereby notifies the lapsing of the said Reservation in respect of the said Lands as per the provisions of section 127 (2) of the said Act and for that purpose amends the said Notification of the said sanctioned Development Plan, as follows :-

After the last entry in the Schedule of Modifictions accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added :-

SCHEDULE

Sr. No.	Municipal Council, Mouja, Tal, Dist.	Reservation of the said sanctioned Development Plan & its Approximate Area as per D. P. Report	Description of the said Lands under the said Notice	Approximate Area lapsed from the said Reservation (Ha.)
1	Kinwat Municipal Council, Mouje Kinwat, Tal.Kinwat, Dist. Nanded.	Site No. 34 A- " Truck Terminal" (4.75 Ha.)	S. No. 294 (part)	0.43 Ha.
			S. No. 295	0.35 Ha.
			S. No. 296	1.63 Ha.
			Total-	**2.41 Ha.**

Note :-

1)The said Lands so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent Land under the said sanctioned Development Plan.

2) A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said Reservation, is available in the Office of the Chief Officer, Municipal Council, Kinwat, Kinwat, Dist. Nanded during Office hours on all working days for inspection to public up to one month.

3) This Order shall also be published on the Directorate's Official website **www. dtp.maharashtra.gov.in.**

(Avinash B. Patil)
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

४

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) जायकवाडी प्रकल्प, औरंगाबाद यांजकडून

सुधारीत (आर.आर.एफ.) प्रमाणे कलम ११ चे अधिसुचनाचे शुध्दीपत्रक

१. भुसंपादन, पुर्नवसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शतेचा हक्क अधिनियम २०१३

२. मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे आदेश जा.क्र. २०१९/ आरबीडेस्क-४/समन्वय/भुसं/सिआर-०७ दि. २०.०६.२०१६

ज्याअर्थी भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (३० चा २०१३) च्या कलम ३ मधील पोटकलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने, महसुल, व वनविभाग अधिसुचना क्रमांक -११/२०१४/ ७७/-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ (या यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिसुचना असा केला आहे) द्वारे, भुमीसंपादन, पुर्नवसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३(२०१३ चा ३०) (यापुढे याला "सदरहू अधिसुचना" संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करतांना सदरहू कायद्याच्या कलम ३ मधील पोटकलम (ए झेड) नुसार जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसलेल्या शासनाच्या वतीने समुचीत शासन म्हणून घोषित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, या अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी यांना शसानाच्या वतीने समुचीत शासन म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्याअर्थी अनुसुची १ मध्ये दर्शविलेल्या जमिनी (यापुढे त्यांचा उल्लेख "उक्त भुमी " असा करण्यात येईल) अनुसची -२ मध्ये नमुद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरिता आवश्यक आहे किंवा आवश्यक असल्याच्या संभव आहे. (यापुढे उल्लेख "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करणत येईल) याबाबत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांची समुचीत शासन म्हणून खात्री झाल्यामुळे सदरहू कायद्याच्या कलम -११ च्या पोटकलम (१) नुसार सार्वजनिक कामाच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते, असे अधिसुचित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी सदरहू भुमी संपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्था भुमी संपादित करतांना भुधारकास विस्थापित करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसूची -३ मध्ये नमुद केलेले आहे.

आणि ज्याअर्थी भुमी संपादन कायद्यांतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमी संपादन करतांना सामाजिक परिणाम सारांश सोबत जोडलेल्या अनुसूची -४ मध्ये नमुद केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, या भुमी संपादन कायद्याचे कलम ४३ पोट कलम (१) नुसार विस्थापिताचे पुर्नवसन आणि पुन:स्थापना करण्याकरिता सोबत जोडलेल्या अनुसूची-५ मध्ये प्रशासकाचे विवरण नमुद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्यक असल्यास अनुसुची -५ मध्ये माहिती देणे आवश्यक आहे)

त्याअर्थी आता सदरहू कायद्याच्या कलम -११ चे पोटकलम (४) नुसार अधिसुचना प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन सदरहू भुमी कायद्याच्या प्रकरण ४ खाली कार्यवाही पूर्ण होईपर्यंत कोणतीही व्यक्ती उक्त जमिनीचा अथवा जमिनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतू जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसुचित केलेल्या मालकांने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट- कलमाच्या अंमलबजावणीमधुन अशा भुमी मालकास सुट देऊ शकेल.

परंतू आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतिची जिल्हाधिकारी द्वारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदरहू भुमी संपादन कायद्याचे कलम-११ च्या पोट कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी हे भूमीसंपादन पुनर्वसन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यापुढे ज्यांचा उल्लेख उक्त नियम असा करण्यात येईल) चे नियम १० मधीन उपनियम (३) अन्वये भुमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेतील.

आणि म्हणून त्याअर्थी, समुचीत शासन म्हणून जिल्हाधिकारी सदरहू कायद्याचे कलम ३ पोटकलम (ग) अन्वये उप जिल्हाधिकारी भुसंपादन जायकवाडी प्रकल्प औरंगाबाद यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची -१

भूमी वर्णन : मोजणी प्रमाणे

गाव : मौजे जानेफळ, तालुका : वैजापुर, जिल्हा : औरंगाबाद.

अ.क्र.	सर्व्हे नं. / गट नंबर	अंदाजे क्षेत्र (हे.आर)
१.	८१, ८३	०२ हे. ४५ आर
	एकुण क्षेत्र	०२ हे. ४५ आर

संपादनाचे प्रयोजन :- पाझर तलाव क्रमांक ०९ मौजे जानेफळ, ता. वैजापुर जि. औरंगाबाद अेआर क्र. २०/२०१६

अनुसूची -२

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण : या प्रकल्पारद्वारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.

प्रकल्पाचे नाव :- पाझर तलाव क्र ०९ मौजे जानेफळ, ता. वैजापुर जि. औरंगाबाद अे.आर.क्र. २०/२०१६.

प्रकल्पाच्या कामाचा तपशील :- पाझर तलाव क्र ०९ मौजे जानेफळ, ता. वैजापुर जि. औरंगाबाद अे.आर.क्र. २०/२०१६.

सामाजिक फायदे :- या प्रकल्पाद्वारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.

अनुसूची -३

बाधीत व्यक्तींचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे :- विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

अनुसूची -४

सामाजिक परिणामाचे निर्धारणाचा गोषवारा

(सामाजिक परिणामाचे निर्धारण करणा-या यंत्रणेने दिल्याप्रमाणे)

१. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३.०३.२०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ मधील तरतुदी लागु करण्यापासुन सुट प्राप्त.

२. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २६.०४.२०१८ नुसार उक्त अधिनियमांचे प्रकरण २ व ३ मधील तरतुदी लागु करण्यापासुन सुट प्राप्त.

अनुसूची -५

१. नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती

ज्या अधिका-याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम : आवश्यकता नाही.

२. सबब माहिती : निरंक

३. प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता : निरंक

प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसुचनेनुसार झाली त्याचा तपशील :- निरंक

टिप :- उक्त जमिनीचा / जमिनीच्या योजनेचे (प्लॅनचे) निरीक्षण उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प औरंगाबाद यांच्या कार्यालयात करता येईल.

दिनांक :- / /२०२३
ठिकाण : औरंगाबाद

(आप्पासाहेब शिंदे)
उपजिल्हाधिकारी
भुसंपादन जायकवाडी प्रकल्प
औरंगाबाद.

५

जिल्हाधिकारी औरंगाबाद, यांजकडून

अनुसूची - एक
जमिनीचे वर्णन

गांव : लाडसावंगी तालुका : औरंगाबाद जिल्हा : औरंगाबाद

अनु क्रमांक	गट क्रमांक	अंदाजित क्षेत्र (हेक्टर)
१	२१०	०.८२
	एकुण	०.८२

अनुसूची - दोन
सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- प्राथमिक आरोग्य केंद्र लाडसावंगी
प्रकल्पाचे वर्णन :- प्राथमिक आरोग्य केंद्र लाडसावंगी
समाजाला मिळणारे लाभ :- आरोग्य विषयक सोई सुविधा व कर्मचा-यांचे निवासस्थान.

अनुसूची - तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे . :- विस्थापनाची आवश्यकता नाही सबब माहिती निरंक

अनुसूची - चार

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :- महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक १३.०३.२०१५ व २६.०४.२०१८ अनुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २व३ मधील तरतुदी लागु करण्यापासुन सुट प्राप्त

अनुसूची - पाच
नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांचे पदनाम :- निरंक
ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक
क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील :- निरंक

(रामेश्वर रावसाहेब रोडगे)
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, औरंगाबाद

(आस्तिक कुमार पाण्डेय, भा.प्र.से)
जिल्हाधिकारी, औरंगाबाद

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, AURANGABAD-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.